एमएचएमएम२३००३९९४२०२४

दाखल दिनांक : १२/१२/२०२४
नोंदणी दिनांक : १२/१२/२०२४
निकाल दिनांक : १०/०७/२०२५
कालावधी : ०० वर्ष ०६ म. २८ दि.
निशाणी क्रमांक — १०

भाग 'अ'
Form No. XXXII
(फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण क्र. ६ मधील परिच्छेद ४४(१))

| | | |
|---|---|---|
| | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, २७ वे न्यायालय, मुलुंड, मुंबई यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी : एस. व्ही. स्वामी)<br>(आज दिनांक १० जुलै, २०२५ रोजी खुल्या न्यायदालनात घोषित)<br>खटला क्रमांक ७५२/पी.डब्ल्यु./२०२४ | |
| | (पहिली खबर/गुन्हा क्रमांक २५/२०२४ भारतीय दंड विधान कलम ४२०, ५०६ सह कलम ३४<br>पोलीस ठाणे : नवघर | |
| फिर्यादी | | महाराष्ट्र् शासन<br>(मार्फत पोलीस ठाणे, नवघर, मुंबई) |
| अधिवक्ता | | विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती वैशाली आगवणे |
| आरोपी | | १. जयराम जेठा गामी<br>२. गोविंद जेठा गामी<br>३. केशव दामजी मिनात<br>४. प्रेमजी वेलजी पटेल |

| | | |
|---|---|---|
| अधिवक्ता | | सर्व आरोपींकरिता विद्वान अधिवक्ता श्री. अभिषेक गोखले |

भाग 'ब'

(फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण क्रमांक ६ मधील परिच्छेद ४४(१))

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | ०१/०१/२०१७ ते ०३/०२/२०२४ |
| गुन्हा नोंदवल्याची तारीख | ०३/०२/२०२४ |
| अंतिम अहवालाची तारीख | १२/१२/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०७/०७/२०२५ |
| पुरावा नोंदवण्यास सुरुवात झाल्याची तारीख | ०७/०७/२०२५ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याची तारीख | १०/०७/२०२५ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०७/२०२५ |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा क्रम | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमिनावर मुक्त केल्याची तारीख | ज्या बद्दल तक्रार दिली अथवा शाबीत झालेला अपराध | निर्दोष मुक्त केले / शिक्षा | झालेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार पुर्वी भोगलेल्या कारावास कमी केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जयराम जेठा गामी | — | — | भारतीय दंड विधान कलम ४२०, | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०६, ३४ | | | |
| २ | गोविंद जेठा गामी | — | — | भारतीय दंड विधान कलम ४२०, ५०६, ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ३ | केशव दामजी मिनात | — | — | भारतीय दंड विधान कलम ४२०, ५०६, ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ४ | प्रेमजी वेलजी पटेल | — | — | भारतीय दंड विधान कलम ४२०, ५०६, ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

भाग 'क'

अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची सुची

अ. अभियोगपक्ष :

| अनु.क्रमांक | नाव | पुरावा प्रत्यक्षदर्शी (साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्ष — साक्षीदार क्र. १ | अतुल दत्तात्रय शिरोडकर | फिर्यादी |

ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यास :

| अनु. क्र. | नाव | पुरावा (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :

| अनु.क्र. | नाव | पुरावा (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची सुची

अ. अभियोगपक्ष

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रमांक — ८/ साक्षीदार क्रमांक १ | फिर्यादी क्रमांक १ ची साक्ष |
| २ | निशाणी क्रमांक — ९/ साक्षीदार क्रमांक १ | प्रथम खबर अहवालामधील फिर्यादीची सही |

ब. बचावपक्ष

| अनु क्रमाक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन निशाणी :

| अनु क्रमाक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

ड. मुख्य वस्तु :

| अनु क्रमाक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (दिनांक १०/०७/२०२५)

**१.** आरोपींविरूद्ध भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ४२०, ५०६ सह कलम ३४ नुसार आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

**२.** थोडक्यात केसची हकीकत अशी की, दिनांक ०१/०१/२०१७ ते ०३/०२/२०२४ या कालावधीत अनुथम बिल्डिंग, मराठा मंडळ जवळ, मुलुंड (पुर्व), मुंबई येथे आरोपी क्रमांक १ ते ४ यांनी फिर्यादी यांचेबरोबर सबव्हेन्शन स्किमनुसार करार केल्यानंतर रुम नं. ई ८०१ व ई ८०२ ची रजिस्टर्ड ॲग्रीमेंट करुन दोन्ही रुमची किंमत रुपये २,२०,२८,०००/— इतकी ठरलेनंतर फिर्यादी यांनी पी.एन.एच.बी.एफ.एल. यांचेकडुन १,६४,०४,९०४/— रुपये कर्ज स्वरुपात व उर्वरित ५९,८१,७२१/— वेळोवेळी चेकद्वारे अशी एकुण २,२३,८६,६२५/— रुपये अमरदिप कन्स्ट्रक्शन यांना देवुनसुध्दा अमरदिप कन्स्ट्रक्शन यांचे भागीदार आरोपी क्रमांक १ ते ४ यांनी सदर रुमचा ताबा फिर्यादी यांना न देता त्यांची विश्वासघात करुन फसवणुक केली व धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरूध्द नवघर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली.

**३.** नवघर पोलीसांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने आरोपींविरुध्द गुन्हा नोंद क्रमांक २५/२०२४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास हा सहायक पोलीस निरिक्षक अजित पाटील यांच्याकडे सोपविण्यात

आला. तपास अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्हयातील आरोपींना अटक केली. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपी यांनी अपराध केला असे निष्पन्न झाले म्हणुन आरोपींविरुध्द कलम ४२०, ५०६ सह कलम ३४ भारतीय दंड विधान संहिता अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

४. आरोपी हजर झाल्यानंतर आरोपींवर भारतीय दंड विधान संहिता कलम ४२०, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपींनी गुन्हा अमान्य केला व संपरिक्षेची मागणी केली.

५. अभियोग पक्षाने आरोपींवरील दोषारोप शाबित करण्याच्या अनुषंगाने फिर्यादी याला निशाणी क्रमांक—८ अन्वये तपासले. फिर्यादी अतुल दत्तात्रय शिरोडकर याने अभियोगपक्षाच्या कथनाचे समर्थन केले नाही. आरोपी व मुख्य तक्रारदार यांच्या दरम्यान तडजोड झाल्यामुळे पुढील साक्षीदार तपासुन उपयोग होणार नसल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व आरोपींविरुध्द कोणताही दोषजन्य पुरावा न आल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. सहाय्यक सरकारी वकील श्रीमती वैशाली आगवणे व आरोपीं तर्फे वकील श्री. अभिषेक गोखले यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

७. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर व आरोपीवरील दोषारोप यावरुन खालील मुद्दे निर्माण झाले. सदर मुद्दयांचा निष्कर्ष खालील कारणमिमांसेआधारे नोंदवित आहे.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ | नकारार्थी |

दिनांक ०१/०१/२०१७ ते ०३/०२/२०२४ या कालावधीत अनुथम सोसायटी, मुलुंड (पुर्व), मुंबई या ठिकाणी फिर्यादी यांचेबरोबर सबव्हेन्शन स्किमनुसार करार केल्यानंतर रुम नं. ई ८०१ व ई ८०२ ची रजिस्टर्ड ॲग्रीमेंट करुन दोन्ही रुमची किंमत २,२०,२८,०००/— इतकी ठरलेनंतर फिर्यादी यांनी पी.एन.एच.बी.एफ.एल. यांचेकडुन १,६४,०४,९०४/— रुपयाचे कर्जस्वरुपात व उर्वरित ५९,८१,७२१/— वेळोवेळी चेकद्वारे अशी एकुण २,२३,८६६२५/—रुपये अमरदिप कन्स्ट्क्शन यांना देवुनसुध्दा अमरदिप कन्स्ट्क्शन यांचे भागीदार आरोपींनी सदर रुमचा ताबा फिर्यादी यांना न देता विश्वासघात केला व फिर्यादीची ठकवणुक केली व फिर्यादी यांना मालमत्ता सुपूर्त करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त केले आणि म्हणुन भारतीय दंड विधान कलम ४२० सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे सरकार पक्षाने सिध्द केले काय ?

२ आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ वरील दिनांक, तारीख व वेळी फिर्यादीला फौजदारी पात्र धाकदपटशा केला आणि म्हणुन भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? नकारार्थी

| | |
|---|---|
| **३** आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## —: कारणमिमांसा :—

**मुद्दा क्रमांक १ व २ : —**

**८.** फिर्यादी अतुल दत्तात्रय शिरोडकर (साक्षीदार क्रमांक १) यांनी त्याच्या साक्षीमध्ये तक्रारमध्ये नमुद असणारी संपुर्ण घटना नाकारली आहे. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सुचक प्रश्न विचारुन त्यांना पूरक असणारा पुरावा आणण्याचा प्रयत्न केला. परंतु, साक्षीदाराने संपुर्ण कथने नाकारली. एकंदरित अभियोग पक्ष साक्षीदार क्रमांक १ याच्या साक्षीतुन कुठलीही महत्त्वपुर्ण कबुली न्यायालयासमक्ष आणु शकले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात घटना ही तक्रारीप्रमाणे झाली याबाबत दाट संशय निर्माण करते. तसेच, घटना खरोखरच झाली होती याबाबत सुध्दा दाट संशय निर्माण होतो.

**९.** अभियोग पक्षातर्फे घटनेतील एकमेव पिडीत साक्षीदार हाच कोणतीही घटना घडली नव्हती असे कथन करीत आहे. अशा परिस्थितीत इतर साक्षीदारांची साक्ष घेवुन देखील त्याचा फारसा उपयोग झाला नसता. सबब, मी या निष्कर्षास आलो आहे की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द रेखांकित केलेले दोषारोप सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकलेले नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ३ —**

**१०.** अभियोगपक्ष आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, एकंदरीत कारणांच्या विचारांती मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर खालील आदेशाप्रमाणे देण्यात येते.

## आदेश

१) आरोपी क्रमांक १ जयराम जेठा गामी, आरोपी क्रमांक २ गोविंद जेठा गामी, आरोपी क्रमांक ३ केशव दामजी मिनात व आरोपी क्रमांक ४ प्रेमजी वेलजी पटेल यांस फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान कलम ४२०, ५०६ सह कलम ३४ या दोषारोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचा पुर्वीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ नुसार दिलेला जामीन पुढील सहा महिन्यापर्यंत अंमलात राहिल.

४) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.

SANDEEP VIRBHADRA SWAMI
Digitally signed by SANDEEP VIRBHADRA SWAMI
Date: 2025.07.10 17:50:11 +0530

दिनांक — १०/०७/२०२५ (एस. व्ही. स्वामी)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
२७ वे न्यायालय, मुलुंड, मुंबई

Dictated on : 10/07/2025
Typed on : 10/07/2025

Signed on : 10/07/2025